मराठी
न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# सहामाहित शहरातील तिन्ही मतदार संघात मतदारवाढ

## आगामी निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर निवडणूक आयोगाने विशेष संक्षिप्त पुनर्रीक्षण : पिंपरी, चिंचवड व भोसरी विधानसभा मतदारसंघांत मतदार नोंदणी मोहीम राबविली

**पिंपरी | प्रतिनिधी**

विधानसभेच्या आगामी निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर निवडणूक आयोगाने विशेष संक्षिप्त पुनर्रीक्षण कार्यक्रम राबविला. त्याअंतर्गत पिंपरी, चिंचवड व भोसरी विधानसभा मतदारसंघांत मतदार नोंदणी मोहीम राबविली. त्याची प्रारूप मतदारयादी जिल्हाधिकारी कार्यालयाने सहा ऑगस्ट रोजी प्रसिद्ध केली आहे.

फेब्रुवारी ते जुलै २०२४ या सहा महिन्यांत तब्बल ६७ हजार ७६७ तर, लोकसभा निवडणुकीनंतर अर्थात जून व जुलै या दोन महिन्यांत २० हजार ३७२ मतदार वाढले आहेत. याम्ध्ये काहींची नावे लगतच्या भागातील इतर मतदार यादीत आहेत. पुरुषाच्या ठिकाणी महिलेचा अन् महिलांच्या नावापुढे पुरुषांचे छायाचित्र आहेत. स्थलांतर झाल्यामुळे नाव वगळणे आदींसाठी नमुना क्रमांक ७; पत्ता बदल, दुरुस्ती, दुबार मतदान कार्ड मिळणे आदींसाठी नमुना क्रमांक ८ हे अर्ज भरावे लागतात.



### लोकसभेपेक्षा 20 हजार अधिक

» लोकसभा निवडणुकीसाठी १३ मे २०२४ रोजी मतदान झाले. त्यासाठी २५ एप्रिल २०२४ पर्यंतची मतदार नोंदणी ग्राह्य धरली होती. जानेवारीपासून मतदार पुनरिर्क्षण कार्यक्रम राबविला होता. त्यावेळी तब्बल ४७ हजार ३९५ मतदार वाढल्याने शहरातील लोकसभा निवडणुकीसाठी १५ लाख ४३ हजार २७५ मतदार होते.

### दुरुस्तीसाठी अर्ज

» प्रारूप मतदार यादीत नाव नसलेल्या पात्र मतदारांना मतदार यादीत नाव नोंदणीसाठीचा अर्ज नमुना क्रमांक ६; नाव समाविष्ट करण्यास हरकत, यादीत यापूर्वीच समाविष्ट असलेले नाव वगळणे, स्थलांतर झाल्यामुळे नाव वगळणे आदींसाठी नमुना क्रमांक ७; पत्ता बदल, तपशिलात दुरुस्ती, दुबार मतदान कार्ड मिळणे आदींसाठी नमुना क्रमांक ८ हे अर्ज भरावे लागतात.

### प्रारूप यादीवर हरकती

» मतदार यादीत दुबार नावे आहेत. शिवाय, दुबार ओळखपत्रही आहेत. त्यांची स्वतंत्र ओळखपत्रेही आहेत. काहींची नावे लगतच्या भागातील इतर मतदार यादीत आहेत. पुरुषाच्या ठिकाणी महिलेचा अन् महिलांच्या नावापुढे पुरुषांचे छायाचित्र आहेत.

### मतदार संख्या वाढीची कारणे

» बाहेरील व्यक्तींचे शहरात राहायला येणे.
» वयाची १८ वर्षे पूर्ण झालेले नवमतदार नोंदणी.
» शहरांतर्गत एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी स्थलांतर.

“ प्रारूप मतदार यादी प्रसिद्ध केली होती. त्यावर हरकती व सूचना मागवल्या होत्या. आता अंतिम मतदारयादी प्रसिद्ध केली जाईल. पण, नवीन मतदार नोंदणी व दुरुस्तीचे काम सुरूच असेल. त्यांची पुरवणी मतदारयादी तयार केली जाईल.

- अपर्णा देशपांडे, नायब तहसीलदार, भोसरी विधानसभा मतदारसंघ.

# बदलापूरमधील घटनेच्या निषेधार्थ राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे आंदोलन

## बदलापूर येथे दोन लहान चिमुकल्यांवर झालेल्या अत्याचाराच्या घटनेच्या निषेधार्थ देवेंद्र फडणवीस यांनी गृहमंत्रीपदाचा राजीनामा देण्याची मागणी

**पिंपरी | प्रतिनिधी**

बदलापूर येथे दोन लहान चिमुकल्यांवर झालेल्या अत्याचाराच्या घटनेच्या निषेधार्थ राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाने आज (बुधवारी) आंदोलन केले. देवेंद्र फडणवीस यांनी गृहमंत्रीपदाचा राजीनामा देण्याची मागणी केली. संत तुकाराम नगर येथील यशवंतराव चव्हाण रुग्णालयासमोर झालेल्या आंदोलनात शहराध्यक्ष तुषार कामठे, माजी नगरसेवक अजित गव्हाणे, गणेश भोंडवे,



सुलक्षणा शिलवंत धर, प्रियंका बारसे, विनायक रणसुभे, नंदकुमार शिंदे तसेच डॉक्टर अभय तांबिले, संतोष कवडे, प्रशांत सपकाळ, कविता कोंडे, अनिल भोसले, संदीप चव्हाण, गणेश काळे, सागर चिंचवडे, संजय पडवळ , धम्मराज साळवे, श्रीमंत जगताप , हेमंत बलकवडे, वंदना आराख, मनीषा शेळके , मोहम्मद सय्यद, लता सूर्यवंशी, राजेश रोजचीरामणी, सचिन गायकवाड, गणेश भांडवलकर, काशिनाथ जगताप व पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते. बदलापूर येथे दोन लहान चिमुकल्यांवर झालेल्या अत्याचाराच्या निषेधार्थ, कोलकाता येथील महिला डॉक्टर भगिनीवर झालेल्या अत्याचारा विरोधात व उरण येथे घडलेल्या हत्याकांडा विरोधात मूक मोर्चा तसेच निषेधाचीची स्वाक्षरी अभियान आंदोलन करण्यात आले. शहराध्यक्ष कामठे म्हणाले, “अकार्यक्षम गृहमंत्री हे पक्ष फोडण्यामध्ये, घर फोडण्यामध्ये तसेच संपूर्ण वेळ प्रचारामध्ये व्यस्त असल्याकारणाने राज्यातील कायदा व सुव्यवस्थेबाबत त्यांना गांभीर्य उरलेले दिसून येत नाही.कधी नव्हे तो एवढा कायदा सुव्यवस्थेचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. पोलीस प्रशासनाला संपूर्ण वेळ सरकारी खर्चावर चाललेल्या प्रचारासाठी सत्तेतील नेत्यांना सुरक्षा पुरवण्याचे काम दिले आहे.”

# वैफल्यग्रस्त अमोल थोरातांचे बेताल वक्तव्य..

## पिंपरी-चिंचवड शहर भाजपचे चिटणीस सचिन काळभोर यांचा घणाघाती आरोप...

**पुणे | प्रतिनिधी**

भारतीय जनता पक्षाचे कार्यकर्ते अमोल थोरात वैफल्यग्रस्त होऊन शहराध्यक्ष शंकर जगताप यांच्या विरोधात वैयक्तिक पातळीवर टीकाटिपण्णी करून सोशल मीडियावर सवंग प्रसिद्धी मिळवत आहेत. शहरातील काही भाजपचे कार्यकर्ते पक्ष सोडून गेल्याचे खापर शहराध्यक्ष शंकर जगताप व आमदार महेश लांडगे यांच्यावर फोडत आहेत. याच रागातून थोरात यांनी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे तक्रार केली आहे. मात्र, थोरात यांचे वैफल्यग्रस्तेतून बेताल वक्तव्य



असून, त्यांचे आरोपही बिनबुडाचे आहेत. थोरात यांना पक्षात कवडीची किंमत नसून केवळ माध्यमाकडून सवंग प्रसिद्धीसाठी थोरात हे स्टंटबाजी करत आहेत, असा घणाघाती आरोप पिंपरी-चिंचवड शहर भाजपचे चिटणीस सचिन काळभोर यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे केला आहे.

पत्रकात त्यांनी म्हटले आहे की, विधानसभा निवडणूका डोळ्यासमोर ठेवून भाजपातील काही कार्यकर्त्यांचा उभाठा गटात प्रवेश केला. त्यामुळे अमोल थोरात यांनी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना लेखी पत्राद्वारे पिंपरी-चिंचवड शहराध्यक्ष शंकर जगताप यांच्या विरोधात पक्ष सोडून गेल्यामुळे कारवाई करण्यात यावी, म्हणून मागणी करण्यात आली आहे. त्यासंदर्भात उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना लेखी पत्राद्वारे मागणी करण्यात आली आहे.

गेल्या काही दिवसांपासून अमोल थोरात यांना पक्षात महत्वाचे पद देण्यात आले नाही. शहर कार्यकारिणीमध्येही स्थान देण्यात आले नाही. त्यामुळे वैयक्तिक पातळीवर टिका-टिपण्णी सुरु आहे. सर्वच प्रभागामध्ये चांगल्या प्रकारे काम सुरु असून, ज्या कार्यकर्त्यांची नगरसेवक होण्याची पात्रता नाही, त्यांनी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नावाने भारतीय जनता पक्षाचे शहराध्यक्ष शंकर जगताप व आमदार महेश लांडगे, अश्विनी जगताप यांना बदनाम करु नये, अशीही अपेक्षा सचिन काळभोर यांनी पत्रकाद्वारे व्यक्त केली आहे.

# टाळगाव चिखली येथे जगद्गुरु श्री संत तुकाराम महाराज विरंगुळा केंद्राची उभारणी

## विरंगुळात केंद्रात ज्येष्ठ नागरिकांसाठी बसण्याची व्यवस्था करण्यात आली आहे.

**पुणे | प्रतिनिधी**

श्री क्षेत्र टाळगाव चिखली ग्रामस्थांच्या पुढाकाराने ज्येष्ठ नागरिकांसाठी जगद्गुरु श्री संत तुकाराम महाराज विरंगुळा केंद्राची उभारणी करण्यात आली आहे. या विरंगुळात केंद्रात ज्येष्ठ नागरिकांसाठी बसण्याची व्यवस्था करण्यात आली आहे. टाळगाव चिखली याठिकाणी जेष्ठ नागरिकांसाठी विरंगुळा केंद्र तसेच ज्येष्ठ नागरिकांना विसाव्यासाठी जागा नसल्याची उणीव ग्रामस्थांच्या लक्षात आल्यानंतर टाळगाव चिखली ग्रामस्थांच्या वतीने या ठिकाणी विरंगुळा केंद्राची उभारणी करण्यात आली. नुकतेच या विरंगुळा केंद्राचे उद्घाटन ग्रामस्थांच्या वतीने करण्यात आले असून ते जेष्ठ नागरिकांसाठी खुले करण्यात आले आहे. यावेळी उद्योजक निलेश नेवाळे, सामाजिक कार्यकर्ते विकास साने, मा. महापौर

राहूल जाधव, उद्योजक अमृत सोनवणे, मा.स्विकृत नगरसेवक संतोष मोरे तसेच ग्रामस्थ यावेळी उपस्थित होते. या विरंगुळा केंद्राचा उपयोग




येथे येणाऱ्या जेष्ठ नागरिकांना आपले सुख दुःख तसेच आपल्या विचारांची एकमेकांसोबत देवाण घेवाण करण्यासाठी तसेच गावातील जेष्ठ नागरिकांकडुन गावाच्या प्रगती विषयी ग्रामस्थांना मार्गदर्शन होईल व सर्वात महत्त्वाचे म्हणजे जेष्ठ नागरिकांना या विरंगुळा केंद्रात आपला वेळ आनंदात वितरीत करता येवू शकतो या उद्देशाने हे विरंगुळा केंद्राची उभारणी टाळगावच्या ग्रामस्थांच्या वतीने करण्यात आल्याचे ग्रामस्थांनी सांगितले.

# जय गणेश साम्राज्य, नारायण हट सोसायटीधारकांना दिलासा

## भाजपा आमदार महेश लांडगे यांची विकसकासोबत बैठक

**पुणे | प्रतिनिधी**

भोसरी विधानसभा मतदार संघातील स्पाईन रोड येथील जय गणेश साम्राज्य व नारायण हट सोसायटीतील सदनिकाधारकांच्या विविध समस्या सोडवण्यासाठी पुढाकार घेण्यात येईल. तसेच, 'कन्व्हेयन्स डीड'चे प्रश्नही सोडवण्यात येईल, असे आश्वासन भाजपा आमदार महेश लांडगे यांनी दिले. त्यामुळे संबंधित सोसायटीधारकांना दिलासा मिळाला आहे.

नारायण हट सोसायटी आणि जय गणेश साम्राज्य सोसायटीतील पदाधिकारी, प्रतिनिधी यांनी आमदार महेश लांडगे व विकसक राजेश सांकला यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये विविध समस्यांबाबत बैठक घेतली. यावेळी सामाजिक कार्यकर्ते योगेश लोंढे, सोसायटीचे अंकुशराव गोरडे, संदीप बेंडुरे, डॉ. सुयोग तारळकर, सतीश भालेराव, मनोज पवार, निशिगंधा वाढाणे, उद्धव ढोले, संतोष धायबर, राकेश बेहरा संतोष भागवत, दीपक गवळी, शंकर शिंदे, युवराज पालकर, खंडू मोरे, अनिल नलवडे , विजय निमसे आदी उपस्थित होते.

यावेळी नारायण हट सोसायटीतील रो-हाऊस, शाळा क्रिडांगण, कार्यालय व उद्यान यांचे 'कन्व्हेयन्स डीड', रस्ते दुरुस्ती,



स्ट्रिटलाईट, गुरुविहार सोसायटीकडील रस्ता, प्रशाला जवळील स्केटिंग ग्राउंडच्या जागेतील रस्ता विकसित करण्याबाबत सकारात्मक चर्चा झाली. तसेच, जय गणेश सम्राज्य सोसायटीतील 'कन्व्हेयन्स डीड'सह गणपती मंदिर, महादेव मंदिर, सभामंडप विकसक यांनी करुन द्यावे, अशी सूचना करण्यात आली. ड्रेनेजलाईन १८ इंच व्यासाची करणे, एफ-१ युनिट आणि एफ- २ युनिटमधील रस्ता पुणे-नाशिक महामार्गाला जोडून देणे. प्ले ग्राउंड, कम्युनिटी हॉल, स्ट्रिट लाईट, सभामंडप, सर्विस रोडवर सम-विषम पार्किंग सुविधा करण्याबाबत सूचना करण्यात आल्या आहेत. त्यामुळे सोसायटीधारक नागरिकांनी समाधान व्यक्त केले आहे.

> **पिंपरी-चिंचवडमधील सर्वात मोठी सोसायटी असा लौकीक असलेल्या जय गणेश साम्राज्य सोसायटीसह नारायण हट, प्रिन्सेस व्हीडा या भागात ३ हजाराहून अधिक नागरिक वास्तव्यास आहेत. सोसायटीधारकांच्या पायाभूत सोयी-सुविधा सक्षमपणे उपलब्ध करुन देण्यासाठी आम्ही सातत्याने पाठपुरावा केला आहे. सोयायटीधारक व विकसक यांच्यातील सकारात्मक समन्वयाअभावी निर्माण होणाऱ्या समस्या तात्काळ सोडवण्याबाबत प्रयत्न करीत आहोत.**
>
> **- महेश लांडगे, आमदार, भोसरी विधानसभा, भाजपा, पिंपरी-चिंचवड.**

# ओढे, नाल्यावरील अतिक्रमणे हटविणार

## पालिका आयुक्तांचा ॲक्शन प्लॅन : आठ क्षेत्रीय कार्यालयातील प्रत्येकी एका नाल्यावरील अतिक्रमण काढणार

**पिंपरी | प्रतिनिधी**

शहरात मुसळधार पाऊस झाल्यानंतर अनेक रस्त्यावर आणि सखल भागात पाणी साठून पुरसदृश परिस्थिती निर्माण होत आहे. त्यामुळे शहरातील नैसर्गिक नाले, ओढ्यावर असलेले अतिक्रमण काढण्यात येणार आहे. याकरिता महापालिकेचे आयुक्त शेखर सिंह यांनी ॲक्शन प्लॅन बनवला असून आठ क्षेत्रीय कार्यालयांतर्गत प्रत्येकी एका नाल्यावरचे संपूर्ण अतिक्रमण, बांधकाम काढण्यात येणार आहे. त्यामुळे नैसर्गिक ओढे, नाल्यावर अतिक्रमण आणि बांधकामे करणाऱ्यांचे दाबे दणाणले आहेत. दरम्यान, या कारवाईमुळे बिल्डरांनी नैसर्गिक नाले, ओढे बुजविले असून तेथे अतिक्रमण केल्याची धक्कादायक बाब उघडकीस आली आहे.



महापालिकेच्या हद्दीतील अनेक रस्त्यावर, सखल भागात पाणी साठू लागले आहे. अचानक पडणाऱ्या मुसळधार पावसामुळे पूरसदृश परिस्थिती निर्माण होत आहे. त्यामुळे जलनिस्सारण विभागाकडून शहरातील नैसर्गिक ओढे व नाल्याचे सर्व्हेक्षण करण्यात आले आहे. या सर्वेक्षणात अनेक नैसर्गिक नाले, ओढ्यावर अतिक्रमण करत बांधकाम झाल्याचे स्पष्ट झाले आहे.

तसेच शहराचे वाढते नागरीकरण, लोकसंख्या वाढ आणि झपाट्याने वाढणारी सिमेंट जंगले यामुळे ड्रेनेज लाईन कालबाह्य झाली आहे. शहरात सांडपाणी निचरा करणारी जलनिस्सारण लाईनव्यवस्था देखील जुनी होऊन गळती होत आहे. समाविष्ट आणि नव्याने विकसित होत असलेल्या भागात नैसर्गिक नाले पाईपलाईन टाकून बुजविले गेले आहेत. काही ठिकाणी नाल्यांवरच बांधकामे केली आहेत. त्यामुळे ड्रेनेजलाईन वारंवार तुंबणे, पावसाळ्यात पाण्याचा योग्य निचरा न होणे, लोकवस्तीत पाणी शिरणे आणि रस्त्यावर, भुयारी मार्गात पाणी साचून तळे निर्माण होण्याच्या घटना घडत आहेत.

शहराची लोकसंख्या ३० लाखांच्या आसपास पोहोचली आहे. शहराच्या चारही बाजूने टोलेजंग सिमेंटची जंगले उभारत आहेत. शहरात अर्बन स्ट्रीट डिझाईननुसार सिमेंट कॉक्रिंटचे रस्ते, रस्त्याहून मोठे पदपथ निर्माण केले जात आहेत. त्यामुळे थोडा जरी पाऊस झाला तर रस्त्यावर पाणी साचत आहे. त्या पाण्याचा योग्य निचरा होत नाही. अशावेळी ड्रेनेज लाईन, स्टॉर्म वॉटर लाईन कुचकामी ठरत आहेत.

शहरात लोकसंख्या वाढत असल्याने अनेक भागात रि-डेव्हलमेंट होत आहे. अनेक गावातील चाळी, बैठी घरे, झोपडपट्टी, बंगले तोडून टोलेजंग इमारती उभ्या राहात आहेत. परंतु, त्या भागातील ड्रेनेज लाईन व स्टॉर्म वॉटर जुनी, कमी क्षमतेच्या असल्याने सांडपाणी तिपटीने वाढल्याने ड्रेनेज लाईन वारंवार तुंबण्याचे प्रकार घडत आहेत.

काही भागातील दाट लोकवस्ती, झोपडपट्टी भागात अद्याप ३० वर्ष जुन्याच ड्रेनेजलाईन आहेत. त्या स्वच्छ न केल्याने कचरा, गाळ, दगड साचल्याने त्या चोकअप होत आहेत. काही ड्रेनेज लाईनला घुशी लागल्याने त्या खराब झाल्या आहेत. दगड, माती साचून कायमच्या बंद झाल्याने सांडपाणी प्रवाहास अडथळे निर्माण होत आहेत.

### सखल भागात पाणी, रस्त्यावर कोंडी

» ड्रेनेज लाईन, स्टॉर्म वॉटर यात माती, दगड, प्लास्टीक, कचरा साचून राहात आहे. नैसर्गिक नाले, ओढे हे कमी व्यासाच्या पाईप टाकून बुजविल्या जात आहे. काही ठिकाणी त्यावर थेट अतिक्रमण होत आहे. त्यामुळे सखल भागात पाणी साचून राहते. रस्ते जलमय होतात. घरात पाणी शिरते, गटारे तुंबतात, ड्रेनेज लाईन ओव्हर फ्लो होत आहे. नाल्यांच्या भिंती पडणे, रस्त्यात खड्डे पडणे, रस्त्यात साठलेल्या पाण्यात अपघात होतो. वाहतुकीला अडथळा होणे, सखल भागात पाणी साठून जलमय होणे, अशा घटनांमुळे पावसाळ्यात शहराची कोंडी होत आहे.

महापालिका हद्दीतील नैसर्गिक ओढे, नाल्यावर अतिक्रमण झाले आहे. काही बिल्डरांनी नाले बुजवून कमी व्यासाच्या पाईप टाकलेल्या आहेत. त्यामुळे पाण्याचा निचरा होण्यास अडथळा निर्माण होऊन रस्त्यावर आणि सखल भागात पाणी साचून राहात आहे. कमी वेळेत सर्वाधिक पाऊस झाल्याने पुरसदृश स्थिती निर्माण होत आहे. त्यामुळे महापालिकेने आठ क्षेत्रीय कार्यालयाअंतर्गत प्रत्येकी एक ओढा, नाल्यावरील अतिक्रमण, बांधकामे काढण्यात येणार आहे. त्यामुळे ओढे, नाल्यावर बांधकामे करणाऱ्यांचे धाबे दणाणले आहे.

> “ महापालिकेच्या जलनिस्सारण विभागाकडून शहरात ड्रेनेज लाईन, नैसर्गिक नाले, ओढ्यांचे सर्व्हेक्षण केले आहे. अनेक नैसर्गिक नाले, ड्रेनेज लाईनवर अनधिकृत बांधकामे, अतिक्रमण झाल्याची बाब आढळून आली आहे. ड्रेनेज लाईनमध्ये माती, दगड, कचरा आढळून येत आहे. अनेक ड्रेनेज लाईन खराब होऊन फुटल्या आहेत. काही चोकअप, नादुरुस्त झाल्या आहेत. ड्रेनेजलाईन, स्टॉर्म वॉटर लाईन, त्यांचे चेंबर, नाल्यांचे सर्व्हेक्षण खासगी एजन्सीकडून केले आहे. शहराचे सर्व्हेक्षण पूर्ण झाले असून त्याचा अहवाल तयार केला आहे. त्यामुळे नैसर्गिक नाले, ओढ्यावरील अतिक्रमण, बांधकामे लवकरच काढण्यात येणार आहेत.
>
> **- संजय कुलकर्णी, सह शहर अभियंता, जलनि:स्सारण विभाग.**

# चिखलीच्या बकालतेला जबाबदार कोण? अजित गव्हाणे यांचा सवाल

## मोरेवस्ती, म्हेत्रेवस्ती, नेवाळेवस्ती व आजूबाजूच्या परिसरात सतत होणाऱ्या चोऱ्या, घरफोडी, मारामारी व वाढत असलेल्या गुन्हेगारीमुळे नागरिक त्रस्त आहेत.

**पिंपरी | प्रतिनिधी**

चिखली-या भागातील मोरेवस्ती, म्हेत्रेवस्ती, नेवाळेवस्ती व आजूबाजूच्या परिसरात सतत होणाऱ्या चोऱ्या, घरफोडी, मारामारी व वाढत असलेल्या गुन्हेगारीमुळे नागरिक त्रस्त आहेत. या भागात मोठ्या प्रमाणात अवैध धंदे फोफावले आहेत. परिसराला बकालपणा आला आहे, याला जबाबदार कोण असा सवाल माजी नगरसेवक अजित गव्हाणे यांनी केला. चिखली, नेवाळेवस्ती, मोरेवस्ती या भागांमध्ये अजित गव्हाणे यांनी नागरिकांच्या गाठीभेटी घेतल्या. यावेळी कामगार नेते विष्णुपंत नेवाळे, माजी नगरसेवक संजय नेवाळे, विनायक रणसुभे, सामाजिक कार्यकर्ते विकास साने, यश साने आदी उपस्थित होते. नागरिकांनी येथील गुंडगिरीचा मुद्दा उपस्थित केला. चिखली, मोरेवस्ती, साने वस्ती हा कामगार बहुल भाग आहे. मध्यमवर्गीय कामगारांना स्थानिक नेतृत्वाकडून भयमुक्त वातावरण, चांगल्या शाळांच्या सुविधा, ये जा करण्यासाठी चांगले रस्ते, पाणी या गोष्टींची अपेक्षा होती . या सुविधांसाठी पिंपरी- चिंचवड शहराचा अनेक राज्यांमध्ये लौकिक आहे. मात्र या लौकिकाला भोसरी विधानसभा मतदारसंघाच्या स्थानिक नेतृत्वाने अक्षरश: मातीमोल केले आहे.



अशा भावना नागरिकांनी व्यक्त केल्या. लाखो रुपयांचा फ्लॅट घेतला मात्र वेळेवर पाणी येत नाही अशी कैफियत यावेळी महिलांनी मांडली. चिखली परिसरात आणि रस्त्यांवर मोठमोठे खड्डे पडले आहेत. यावरून ये जा करणे मुश्किल झाले आहे. भंगार गोदामांमध्ये वारंवार आग लागते. यामुळे हवेचे प्रदूषण वाढले आहे. रेडझोनचा प्रश्न अद्यापही सुटलेला नाही. वारंवार आश्वासन दिले गेले. मात्र अजूनही रेड झोनची टांगती तलवार डोक्यावर कायम असल्याचे नागरिकांनी सांगितले. चिखली, मोरेवस्ती, सानेवस्ती हा या भागामध्ये प्रचंड नागरिकरण वाढले आहे. शहराच्या मध्यवर्ती भागातील रेसिडेन्शियल झोन म्हणता येईल अशा प्रकारे हा भाग रहिवासीकरनाच्या दृष्टीने वाढत आहे. मात्र मूलभूत सुविधांची अक्षरशः वाणवा आहे. या भागात घरांची किंमत लाखो रुपयांच्या पुढे पोचली आहे. मात्र घरात पाणी नाही अशी अवस्था आहे. कागदोपत्री आकडेवारी सांगत, सोशल मीडियाच्या माध्यमातून फेक प्रचार करत भाजपच्या स्थानिक आमदारांनी केवळ प्रसिद्धी मिरवली आहे. प्रत्यक्षात खड्डे, पाण्याची टंचाई, गुंडगिरी यामुळे या परिसराचा लौकिक बिघडत आहे. चिखली भागाला अक्षरशः बकालपणा आला आहे. गुंडगिरीला राजश्रय मिळत असल्यामुळे गुंडापुंडांची दहशत प्रचंड वाढले आहे. स्क्रॅप माफिया, आखाड पार्टीसारखी संस्कृती येथे पोहोचली आहे. यातून बाल गुन्हेगाराही तयार व्हायला लागले आहेत. घरफोडी, चोरी यांसारखे प्रकार सर्रास येथे होतात. मात्र पोलिसांच्या माध्यमातून या गुंडगिरीला आळा घालावा अशी मानसिकता येथील भाजप नेतृत्वाची नाही. त्यामुळे या भागातील वातावरण गढूळ होत आहे. महिलांच्या सुरक्षेचा प्रश्न देखील ऐरणीवर आला असल्याचे विकास साने (म्हणाले.

# शहरातील केवळ 40 ठिकाणी शिरले पाणी

## पावसाचा फटका अनेकांना बसूनही महापालिकेचा अजब दावा : बाराशे कर्मचारी होते तैनात

**पुणे | प्रतिनिधी**

शहरात पावसाने गेल्या काही दिवसांपासून विश्रांती घेतली होती. मात्र, शनिवारपासून (दि. १७) मुसळधार पावसाने हजेरी लावत शहराला चांगले झोडपले. शनिवारी रात्री पाऊस पडल्यानंतर रविवारी (दि. १८) संध्याकाळी पावसाने पुन्हा एकदा शहराच्या पूर्व भागाला चांगलाच दणका दिला. वडगाव शेरी भागात ढगफुटी झाल्याने रस्त्याला नदीचे स्वरूप प्राप्त झाले होते. त्यामुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले होते. पावसाचे पाणी अनेकांच्या घरात शिरल्याने नागरिकांना चांगलाच त्रास सहन करावा लागला. महापालिकेने मात्र, शहरातील केवळ ४० ठिकाणीच पाणी शिरल्याचा दावा केला.



शहरात मागच्या काही दिवसात झालेल्या पावसामुळे महापालिकेने केलेल्या पावसाळी कामाचे पितळ उघडे पडले होते. रस्त्यांवर पाणी साचल्याने वाहने बंद पडली होती. गुडघाभर पाण्यात नागरिकांना अडकून पडावे लागले होते. रस्त्यावरील पावसाळी लाईन स्वच्छ केल्याच नसल्याचे समोर आले होते. तसेच या लाईनमध्ये खासगी कंपन्यांच्या ऑप्टिकल फायबर केबल्स टाकल्याचे समोर आले होते. त्यावर महापालिकेने कडक कारवाई केली होती. त्यानंतर पावसाळी लाईन आणि ड्रेनेज लाईनची साफसफाई केल्याचेही सांगितले होते. मात्र शनिवारी आणि रविवारी झालेल्या पावसात रस्त्यांवर पाणी साचले होते. तसेच ड्रेनेज लाईन तुंबल्याने अनेकांच्या घरात पाणी शिरले होते.

मागच्या पावसात याच काही परिसरातील काही भागात पाणी शिरल्याने नागरिकांचे संसार पाण्यात वाहून गेले होते. टिम्बर मार्केट भागातील नाला तुंबल्याने काशेवाडी, भगवा चौक, नेहरू रस्ता, पावभाजी चौक या परिसरातील नागरिकांच्या घरात पाणी शिरले होते. तसेच नाल्याशेजारील दुकानांमध्येदेखील पाणी शिरले. पावसाचे पाणी तुंबण्याला कचरा जबाबदार असल्याचे बोलले जात आहे. मार्केटमधील दुकानांमधील फर्निचरचा कचरा, भुस्सा, लाकडाचे बारीक तुकडे, प्लास्टिकमुळे पाणी तुंबल्याचे समोर आले आहे. महापालिकेच्या कर्मचाऱ्यांनी वेळीच या भागातील पाणी मोकळी करून दिले. तसेच या ठिकाणी दोन डंपर इतका कचरा गोळा करण्यात आला आहे. त्यामुळे कचरा केल्याप्रकरणी मार्केटमधील दुकानदारांवर कडक कारवाई केली जाणार असल्याचे महापालिकेने स्पष्ट केले आहे.

### या भागातील नागरिकांना बसला फटका

**» तासाभराच्या पावसाने नागरिकांची चांगलीच दाणादाण उडाली. त्यामुळे नागरिकांनी महापालिकेच्या कारभारावर पुन्हा एखदा संताप व्यक्त केला. सिंहगड रोड, धायरी, कर्वेनगर, कोथरूड, हडपसर, लुल्लानगर, मार्केट यार्ड, बिबवेवाडी, कात्रज, घोरपडी, सोपानबाग, बीटी कवडे, येरवडा, चंदननगर, खराडी या भागात जोरदार पाऊस झाला. या भागातील नागरिकांनी चांगलाच त्रास सहन करावा. असे असतानाही महापालिकेने केवळ ४० ठिकाणी पाणी शिरल्याचा दावा केल्याने आश्चर्य व्यक्त करण्यात येत आहे.**

# पुणे शहराला मिळणार अतिरिक्त पाणी

## खडकवासला बोगद्याला लवकरच मान्यता : मंत्रिमंडळाच्या बैठकीत संकेत

**पुणे | प्रतिनिधी**

शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या खडकवासला धरणातून ते फुरसुंगीच्या कालव्यापर्यंत अंदाजे २८ किलोमीटर लांबीच्या बोगद्याच्या (भूमिगत कालवा) प्रस्तावाला लवकरच मुहूर्त मिळण्याची चिन्हे आहेत. राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत या प्रस्तावाला मान्यता देण्याचे संकेत उपमुख्यमंत्री तथा जलसंपदामंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिल्याने अडीच अब्ज घनफूट (टीएमसी) अतिरिक्त पाणी उपलब्ध होणार आहे.



पाण्याची होणारी गळती, चोरी; तसेच बाष्पीभवन रोखण्यासाठी खडकवासला धरण ते फुरसुंगी दरम्यान बोगदा करण्याचा प्रस्ताव एका वर्षापूर्वी जलसंपदा विभागाने तयार केला होता. प्रस्तावाची तांत्रिक सल्लागर समितीने छाननी करून त्याला मान्यता दिली होती. त्यानंतर हा प्रस्ताव गेल्या काही महिन्यांपासून राज्याच्या वित्त; तसेच विधी विभागाकडे मान्यतेसाठी प्रलंबित होता. महायुतीच्या सत्तेत अजित पवार सहभागी झाल्यानंतर त्यांनी अर्थमंत्री म्हणून या प्रकल्पाला निधी देऊ, अशी ग्वाही पुण्यातील बैठकीत दिली होती. मात्र, गेल्या सहा महिन्यांपासून हा प्रस्ताव मंत्रालयाच्या लालफितीत अडकला होता. अखेर काल, दौंड तालुक्याचे आमदार राहुल कुल यांच्या पुढाकाराने उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासोबत अधिकाऱ्यांची बैठक झाली. त्या बैठकीत खडकवासला ते फुरसुंगीपर्यंतच्या अडीच हजार कोटी रुपये खर्चाच्या या प्रस्तावावर सविस्तर चर्चा झाली.

### एशियन बँकेचे साह्य

प्रस्तावासाठी एशियन बँकेकडून अडीच हजार कोटींचे आर्थिक साह्य करण्यात येणार आहे. त्यामुळे हा प्रस्ताव येत्या आठवड्यात होणाऱ्या मंत्रीमंडळाच्या बैठकीत ठेऊन त्याला मान्यता मिळण्याचे संकेत उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी संकेत दिले आहेत. दरम्यान, हा प्रस्ताव अंतिम मान्यतेसाठी राज्य सरकारकडे यापूर्वीच पाठविला असून, अंतिम मान्यता लवकरच मान्यता मिळेल अशा शब्दांत जलसंपदा विभागाच्या अधिकाऱ्यांनी दुजोरा दिला.

### भूमिगत कालव्यामुळे काय होणार?

जमिनीपासून १०० ते २०० मीटर खाली हा कालवा असेल.

पाण्याची नासाडी न होता बचत होईल.

पाण्याची गळती किंवा चोरी होणार नाही.

पुणे शहरात कालवा बंदिस्त असल्याने ती जागा सार्वजनिक उपक्रमासाठी वापरता येईल.

### 800 एकर जागेचे होणार काय?

**» खडकवासला धरण ते फुरसुंगीपर्यंतच्या महापालिकेच्या हद्दीच्या जागेचे काय करता येईल याबाबत नंतर विचार करण्यात येणार आहे. या बोगद्यामुळे शहरात मोठ्या प्रमाणात जागा उपलब्ध होण्याची शक्यता आहे. कालव्याची जागा ५०० मीटर ते एक किलोमीटर रुंदीची आहे. त्यातील काही भाग महापालिका आणि पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या (पीएमआरडीए) हद्दीत येतो. २८ किलोमीटर लांबीच्या बोगद्यादरम्यान सुमारे ३५० हेक्टर म्हणजेच सुमारे ८०० एकर जागा उपलब्ध होणार आहे. त्यामुळे या जागेचे काय होणार, त्याचा कसा वापर होणार आणि त्यातून जलसंपदा विभाग किंवा महापालिकेला उत्पन्न मिळणार की आणखी काय होणार, याबाबत अंदाज लढविले जात आहेत.**